# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका,

छत्रपती संभाजीनगर.

**( उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग )**

जा.क्र./मनपा/उद्यान/२०२३/421

दिनांक:- 11-12-2023

**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका स्तरीय "वृक्ष प्राधिकरण समिती" मध्ये समिती सदस्यांची (नामनिर्देशीत) नियुक्ती करणे बाबत.**

## जाहीर प्रगटन

नागरी क्षेत्रातील वृक्ष संरक्षण व जतन अंतर्गत 'महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन मुख्य अधिनियम १९७५' आणि महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १६.०७.२०२१ ची अंमलबजावणी करणेसाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका स्तरीय "वृक्ष प्राधिकरण समिती" कार्यरत आहे. महासभेचा कार्यकाळ संपुष्टात येऊन सद्यस्थितीत महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त असल्याने, अधिनियमातील तरतुदीनुसार प्रशासक हे 'वृक्ष प्राधिकरण' म्हणुन कार्य करीत आहे.

"शासनाद्वारे, वेळोवेळी अधिसूचित करण्यात येईल अशा किमान कालावधीचा, झाडांची लागवड (रोपण), जतन व संवर्धन यांमधील अनुभव असलेल्या बिनसरकारी संघटनांसह सेवानिवृत्त शासकीय अधिका-यांपैकी तज्ञ" पाच व्यक्तिंची वृक्ष प्राधिकरण समिती सदस्य (नामनिर्देशीत) म्हणुन नियुक्ती करणेसाठी खालील पात्रता धारकांकडुन आवेदन/अर्ज मागविण्यात येत आहे.

१) कृषी/वन/उद्यान विद्या शास्त्राची पदवी किंवा पदविका असणा-यांना प्राधान्य.
२) वृक्ष प्राधिकरणावर बिनसरकारी संघटनांचे प्रतिनिधी म्हणुन नियुक्त होण्यास नामनिर्देशीत व्यक्ति शासनाच्या सामाजिक वनीकरण विभागाकडील नोंदणीकृत बिनसरकारी संघटनेचा सक्रीय सदस्य असणे आवश्यक.
३) वृक्षांचे रोपण, जतन व पुनर्रोपण किंवा पर्यावरण संवर्धन क्षेत्रातील विशेष ज्ञान व पाच ते दहा वर्षे अगर अधिक प्रत्यक्ष अनुभव.
४) राष्ट्रीय पातळीवर कार्यरत बिनसरकारी संघटनांना प्राधान्य.
५) नामनिर्देशीत सदस्य स्वतंत्र बिनसरकारी संघटनेचा प्रतिनिधी असावा.
६) कृषी/वन/उद्यान विभागातील सेवानिवृत्त वर्ग १ व २ अधिका-यांना प्राधान्य.
७) समिती सदस्यांना मानधन/भत्ता देय राहणार नाही.
८) समितीचा कार्यकाळ महासभा अस्तित्वात येऊन, समितीचे पुनर्गठण होई पर्यंत अथवा प्रशासक तथा वृक्ष प्राधिकरण यांचे निर्णयाधीन असेल.

उपरोक्त पात्रताधारक इच्छुक प्रतिनिधींनी सविस्तर आवेदन/अर्ज दिनांक 20-12-2023 पर्यंत मुख्य उद्यान अधिकारी, सिध्दार्थ उद्यान, छत्रपती संभाजीनगर येथे सादर करावे. अर्जा सोबत Curriculum Vitae (CV) व संलग्न कागदपत्रे सादर करावीत.

प्राप्त अर्जावर निर्णय घेऊन, वृक्ष प्राधिकरण समिती करीता पाच सदस्य नामनिर्देशीत करण्याचे संपुर्ण अधिकार प्रशासक तथा वृक्ष प्राधिकरण यांना राहतील.

**आयुक्त/प्रशासक,**